

# भूगोल-अर्थशास्त्र, लेख-१३

**सदाशिव पाटील, शाळा :** बालमोहन विद्यामंदिर, दादर

**बोर्ड परीक्षा नमुना प्रश्नपत्रिका**

वेळ २ तास — गुण : ४०

**सूचना :** सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक
: उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
: भारताचा नकाशा आराखडा वापरा.
: नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
: आलेख कागदाचा वापर करावा.

**प्र. १ (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरत्रिकेत लिहा. (३)**

१) जगात ... उत्पादनात भारताचा प्रथम क्रमांक लागतो.
(कॉफी, चहा, गहू, रबर)

२) भारतातील एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे १३ टक्के क्षेत्र... आहे
(बिगर-लागवडीखाली, पडीत क्षेत्राखाली, वनाखाली, लागवडीखाली)

३) मुंबई बंदरावरील ताण कमी करण्यासाठी... येथे बंदर विकसित केले आहे.
(हल्दिया, कांडला, न्हावा-शेवा, मार्मागोवा)

**(ब) योग्य जोड्या जुळवा (३)**

| स्तंभ 'अ' | स्तंभ 'ब' |
|---|---|
| १) गाय | १) बिकानेरी |
| २) म्हैस | २) नागोरी |
| ३) मेंढी | ३) महिसाणा |
| | ४) जर्सी |

**प्र. २ (अ) भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) (४)**

१) उपग्रहांमुळे संदेशवहनात क्रांती झाली आहे.

२) अतिरिक्त लोकसंख्या देशाच्या विकासात अडथळा निर्माण करते.

३) लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यास भारतात आज कमी वाव आहे.

**(ब) टिपा लिहा (कोणत्याही दोन) (४)**

१) उपसासिंचन
२) भूऔष्णिक ऊर्जा
३) संसाधनांचा विकास

**प्र. ३ (अ) दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे विभाजित वर्तुळ काढा. (२)**

(सूची आवश्यक आहे.)
महाराष्ट्रातील विद्युत वापराचे प्रकार पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| शेती - २०%, | औद्योगिक- ४०% |
| घरगुती - ३०%, | व्यावसायिक- १०% |

**(ब) दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्यासंबंधी प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२)**




**प्रश्न :**

१) पंजाबमध्ये रस्त्यांची घनता किती आहे?

२) सर्वाधिक रस्त्यांची घनता असणारे दक्षिणेकडील राज्य कोणते?

३) छत्तीसगढ राज्यात रस्त्यांची घनता किती आहे?

४) ९१ ते १२० घनता असणारे पूर्वेकडील एका राज्याचे नाव लिहा.

**(क) भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा तसेच नावे द्या. चिन्हांची सूची द्या.(कोणतेही दोन) (२)**

१) मुंबई हाय नैसर्गिक वायू उत्पादक क्षेत्र.
२) चेन्नई ते दिल्ली वायुमार्ग.
३) हिराकूड प्रकल्प.
४) भारतातील अग्रेसर ऊस उत्पादक राज्य.

**प्र. ४ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) (८)**

१) वनस्पती व प्राणी यांच्या अवक्षयाबद्दल माहिती लिहा.
२) तांबे खनिजाची उपयोगिता व उत्पादक क्षेत्र याबद्दल माहिती लिहा.
३) भारतातील सुती कापड उद्योगाची माहिती लिहा.

## अर्थशास्त्र

**प्र. ५ दिलेल्या पर्यायामधून योग्य तो पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. (२)**

१) प्रतिष्ठाप्राप्त उद्योगसंस्थांचे स्वत:चे ...० नियंत्रण विभाग आहेत.
(परिमाण, गुणवत्ता, किंमत)

२) आर्थिक वृद्धीची प्रक्रिया ही ... अर्थव्यवस्थेत उद्भवते.
(स्थिर, गतिमान, सशक्त)

**प्र. ६ पुढील प्रश्नांची प्रत्येकी एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) (६)**

१) माहितीचा अधिकार म्हणजे काय?
२) नियोजन आयोगाने नमूद केल्याप्रमाणे अल्पविकास म्हणजे काय?
३) शेतमालाची निर्यात मोठ्या प्रमाणात वाढेल, असे भारताला का वाटत होते?
४) तुटीचे अर्थप्रबंधन म्हणजे काय?
५) उदारीकरणाचा मुख्य उद्देश कोणता?

**प्र. ७ पुढील प्रश्नांची प्रत्येकी पाच ते सहा वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही एक) (४)**

१) उद्दिष्टाधारित सार्वजनिक वितरणप्रणाली स्पष्ट करा.
२) भाववाढीचे वितरणावरील कोणतेही चार परिणाम स्पष्ट करा.

**उद्याचा विषय : भूगोल-अर्थशास्त्र (बोर्ड परीक्षा नमुनाउत्तरपत्रिका)**

लोकसत्ता यशस्वी भव!
दहावी अभ्यास मालिका

संपर्क : yashasvibhava2007@gmail.com